**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१२८-२०२०**

**नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०२०**

**निशाणी क्र. ९३ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा वादीने वाटपाकरिता दाखल केला असून दाव्यातील प्रतिवादी क्र.२ अनिता तुकाराम तांबे या दि.१०/०४/२०१५ रोजी मयत झाल्या आहेत. सदरहू दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.२ चे वारस हे आवश्यक पक्षकार असून त्यांना या दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, प्रतिवादी क्र.२ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.९० येथे मयत प्रतिवादी क्र.२ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.२ अनिता तुकाराम तांबे या दि.१०/०४/२०१५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत

करीत आहे.

## - आदेश -

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना रक्कम रुपये २००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र. २ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.11.19 14:01:19 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.

दिनांकः १८/११/२०२४